# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

**सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**शुक्रवार, दिनांक १३ मार्च, २०२६**

## गृहनिर्माण विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - १४**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: क्यू-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१६, गृहनिर्माण**<br>**रूपये:- ३३,९६,४१,४२,०००/-**<br>**श्री. मनोज जामसुतकर** |
| (१) | १२६९ | १०० | विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमन 2034 (DCPR 2034) मध्ये किमान ४०५ चौ. फुटाचे घर मिळेल अशी तरतूद करण्यात आलेली असणे, परंतु यापुर्वी महाराष्ट्र शासनाने ज्या प्रमाणे बी.डी.डी चाळीतील रहिवाश्यांना ५०० चौ. फुटाचे घर देण्याचा निर्णय घेतला होता, त्याच धर्तीवर गिरण्या चाळीच्या संदर्भात शासनाने निर्णय घेऊन मुंबईतील सी.एस.क्र.2/707, माझगाव डिव्हिजन इमारत क्र.24 आणि 24 A, वॉर्ड नं. इ-8194 आणि इ-8196, चिंचपोकळी, क्रॉस रोड, येथील पंगेरी चाळ या इमारतीचा पुनर्विकास करुन येथील रहिवाश्यांना 500 चौरस फुटापर्यंत मोफत घरे देण्याची होत असलेली मागणी, तसेच प्रत्येकी दोन खोल्यामागे 1 पार्किंग मिळावी, त्याच प्रमाणे कॉर्पस फंड (Corpus Fund) ५०,००० (पन्नास हजार) रुपये ऐवजी १०,००,००० (दहा लाख) मिळावे इत्यादी मागण्या पंगेरी रहिवाशी सेवा संघाकडून करण्यात येत असणे, त्यांच्या या मागणीबाबत शासनाने तातडीने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२) | १२७० | १०० | भायखळा विधानसभा क्षेत्रातील ना.म.जोशी मार्ग येथील विनायक वासुदेव चाळीचा पुनर्विकास गेल्या अनेक वर्षापासून रखडलेला असणे, सदर चाळीतील 270 मराठी रहिवाशी गेल्या 25 ते 30 वर्षापासून मुंबई महापालिका, म्हाडा व राज्य शासनाकडे पाठपुरावा करीत असणे, सन 2007 मध्ये सदर चाळीच्या पुनर्विकास प्रकल्पास म्हाडाकडून ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले असून गेल्या 18 वर्षापासून प्रकल्पाच्या बांधकामासंदर्भात विकासकाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसणे, तसेच सन 2016-17 मध्ये प्रकल्पासाठी प्रत्येक रहिवाशांकरीता 6 लाख रुपये कॉर्पस फंड व 17 हजार रुपये भाडे मंजूर केलेले असतांनाही विकासकानी रहिवाशी / भाडेकरुना अद्यापही भाडे दिलेले नसणे, सन 2022 मध्ये दुस-यांदा म्हाडाकडून ना-हरकत घेवून पुन्हा सर्व रहिवाशांनी |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | संमतीपत्रके भरुन दिलेली असणे, उक्त चाळीतील 70 रहिवाशांनी प्रकल्पाकरीता स्वत:ची खोली मालकाकडे हस्तांतर करणे, तथापी अद्यापपर्यंत विकासकांनी पुनर्विकासाचे काम सुरु न करणे, विकासकाकडून सदर चाळीतील रहिवाशांची फसवणूक करण्यात येणे, सदर चाळीचे मालक व विकासक दिपक गोराडीया यांच्याकडून रहिवाश्यांना उडवाउडवीची उत्तरे देण्यात येत असणे, शासनाने सदर प्रकरणी लक्ष घालून विनायक वासुदेव चाळीचा तातडीने पुनर्विकास करुन रहिवाश्यांना न्याय मिळवून देण्याच्या अनुषंगाने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३) | १२७१ | १०० | मुंबईतील माझगाव, ताडवाडी येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या 100 वर्षाहून जून्या बी.आय.टी. चाळी असणे, सदर चाळी अत्यंत जीर्ण व धोकादायक झालेल्या असणे, सदर चाळींचा पुनर्विकाच्या अनुषंगाने येथील रहिवाशी/भाडेकरुंनी माझगाव ताडवाडी सहकारी गृहनिर्माण संस्थेची स्थापना करुन त्याच्या माध्यमातून सन 2005 मध्ये एका विकासकाची केलेली नियुक्ती, तथापी सन 2005 ते 2018 पर्यंत पुर्नविकासास प्रत्यक्ष सुरुवात न झाल्याने सदर विकासकाची नियुक्ती महापालिकेने रद्द करणे, त्याचप्रमाणे बी.आय.टी. चाळ क्र. 12 ते 16 या इमारतींची अवस्था अत्यंत धोकादायक झाल्यामुळे येथील 220 कुटुंबियांना बळजबरीने महापालिकेने माहुल येथील प्रदुषणरहित संक्रमण शिबिरात स्थलांतरीत करणे, तसेच 180 कुटुंबियांसाठी प्रत्यक्ष जागेवर संक्रमण शिबिर निर्माण करुन त्याठिकाणी स्थलांतरीत करण्यात येणे, तथापी सदर संक्रमण शिबिर देखील जीर्ण झाले असून सदरच्या संक्रमण शिबिराची अवस्था दयनीय झालेली असणे, शासनाने ज्याप्रमाणे बी.डी.डी. चाळी व काळाचौकी अभ्युदयनगर येथील रहिवाश्यांकरीता पुर्नविकासासाठी धोरण राबविले त्याच धर्तीवर माझगाव ताडवाडी येथील बी.आय.टी.चाळींचा पुनर्विकास करण्यात यावा तसेच माहुल येथील प्रदुषित परिसरात 220 कुटुंबियांना माझगाव येथे स्थलांतरीत करण्याचीही रहिवाश्यांकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अमिन पटेल** |
| (४) | १३०२ | १० | ''मुंबई येथील गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रलंबित प्रश्नावर शासनाकडून वारंवार आश्वासने देण्यात आली असतानाही प्रत्यक्षात त्यांची पूर्तता झालेली नसल्याने संतप्त गिरणी कामगार संघटनांनी आक्रमक भूमिका घेत 'गिरणी कामगार संयुक्त लढा समिती' च्या वतीने दि. १० मार्च २०२६ रोजी विधानभवनावर मोर्चा काढण्याचा देण्यात आलेला इशारा, पात्र गिरणी कामगारांना मुंबई शहरातच घरे द्यावीत, मुंबईबाहेरील पर्याय मान्य होणार नसणे अशी संघटनांची ठाम भूमिका असणे, घरांसंदर्भातील प्रलंबित पात्रता पडताळणी, सोडत प्रक्रिया, बांधकाम प्रगती व प्रत्यक्ष घरवाटप याबाबत शासनाकडून ठोस व पारदर्शक कार्यवाही झालेली दिसून येत नसणे, अद्यापही मोठ्या संख्येने पात्र कामगार घरे मिळण्याच्या प्रतीक्षेत |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | असून त्यांच्या कुटुंबियांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असणे, या पार्श्वभूमीवर स्वतंत्र कृती आराखडा जाहीर करून निश्चित कालमर्यादा ठरविणे, प्रलंबित प्रक्रिया तातडीने पूर्ण करणे व घरवाटपाबाबत स्पष्ट वेळापत्रक जाहीर करणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने तात्काळ कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रीया." |
| (५) | १३०३ | १० | दक्षिण मुंबईमध्ये पायधुनी, भुलेश्वर, उमरखाडी, कामाठीपुरा, नळबाजार, काळबादेवी, मोहम्मद अली रोड हा परिसर सतत गजबजलेला असणे, या परिसरात अनेक जुन्या व जीर्ण इमारती असणे, येथील परिसरात इमारती कोसळण्याचे प्रकार घडत असणे, या जुन्या व जीर्ण इमारतींमधील रहिवाशी जीव मुठीत घेऊन रहाणे, या परिसरातील अनेक इमारती या अतिशय जुन्या झाल्या असल्याने या भागात दरवर्षी दुर्घटना घडून अनेक लोकांचे मृत्यू होत असणे, प्रशासनाच्या दुर्लक्षितपणामुळे येथील अनेक जुन्या इमारतीत बेकायदा बांधकामे आढळून येणे , यामुळे शासनाने येथील इमारतींचे सर्वेक्षण करून व बेकायदा बांधकामे तपासून येथील जुन्या इमारतींचा पुनर्विकास करण्याची गरज निर्माण झालेली असणे, परंतु या सर्वेक्षणासाठी म्हाडाकडे कर्मचारी वर्गाचा तुटवडा असणे, याप्रकरणी संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी शासनाकडून मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास करण्यास विलंब होत असणे, परिणामी येथील जुन्या इमारतींमधील रहिवाश्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. रामदास मसराम** |
| (६) | १३७३ | १० | मुंबईतील भायखळा येथील इस्सा इमारतीचे घरमालक आणि विकासक श्री. फुदिनावाला मोहम्मद रफीक उस्मान यांनी भायखळा विभागाच्या सी.एस. क्रमांक १/१७४२ असलेल्या उपकर क्रमांक ई-३८८७ आणि ई-३८८७ (१४) असलेल्या भूखंडावर उभ्या असलेल्या इस्सा इमारतीचा पुनर्विकास करीत असणे, ही इमारत १३ सी आणि १३ डी/१६५ सी, मौलाना आझाद रोड आणि रिपन क्रॉस लेन, भायखळा, मुंबई ४०००८ येथे असणे, उक्त इमारतीत ८२ भाडेकरू निवासी आणि अनिवासी असणे, विकासकाने म्हाडाची एनओसी आणि आयओडी मिळवली असणे, विकासकाने म्हाडाकडून निवासी भाडेकरूंच्या ३५% फंजीबल (Fungible area) क्षेत्रफळाचा दावा करणे, त्यानुसार, निवासी भाडेकरूंना सुमारे ३०० चौरस फूट + ५% प्रोत्साहन क्षेत्र + ३५% फंजीबल आणि अनिवासी भाडेकरूंना विद्यमान क्षेत्रफळ ५% प्रोत्साहन क्षेत्र + ३५% फंजीबल क्षेत्रफळाचा हक्क असणे, तथापि, विकासक भाडेकरूला + ५% प्रोत्साहन क्षेत्र (Incentive area) + ३५% फंजीबल क्षेत्र देण्यास नकार देणे आणि इमारतींच्या सर्व भाडेकरूंची फसवणूक करत असणे, विकासक भाडेकरूंचे सदर फंजीबल क्षेत्र खुल्या बाजारात विकण्याची शक्यता असणे, विकासक बाजार दरानुसार पुरेसे भाडे |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | देत नसणे, विकासक फक्त १५,०००/- रुपये भाडे देत असणे, शिवाय विकासक/जमीनदार भाडेकरूसोबत असलेल्या कायमस्वरूपी पर्यायी निवासस्थानात फ्लॅट क्रमांक आणि मजला क्रमांक नमूद करण्यास देखील नकार देणे, विकासकाने MHADA \| एनओसीमध्ये नमूद केलेल्या अटींचे देखील पालन केलेले नसणे, म्हणजेच कॉर्पस फंड न देणे आणि अनिवार्य पार्किंग क्षेत्र वाटप करणे, उपमुख्य अभियंता (परिमंडळ-३) व कार्यकारी अभियंता, ई-२ विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्बांधणी मंडळ विकासकाविरुद्ध कोणतीही कारवाई करीत नसणे, त्यामुळे येथील भाडेकरुंमध्ये व्यक्त होणारा रोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. सुनील राऊत** |
| (७) | १३३९ | १० | स्थानिक लोकप्रतिनिधींच्या विक्रोळी मतदार संघातील कन्नमवार नगर व टागोरनगर मध्ये म्हाडा वसाहती असून या वसाहतीमधील मलनिस्सारण वाहिन्या जुन्या व जीर्ण झालेल्या असणे, मलनिस्सारण वाहिन्यांना गळती लागत असल्याने सांडपाणी रस्त्यावर येऊन सर्वत्र दुर्गंधी पसरत असणे, तसेच या भागात मोठया प्रमाणात पुनर्विकासाचे काम सुरु असल्याने लोकसंख्येत देखील वाढ होत असणे, सदर वसाहतीमधील मलनिस्सारण वाहिन्या 230 मिमी व्यासाची असल्याने क्षमता कमी होत असल्याने त्यांचे उन्नतीकरण होणे गरजेचे असणे, याकरिता महानगरपालिकेने 29,77,49,038/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकाची निविदा मागविणे, तसेच टागोरनगर येथील विविध रस्त्यांवर मलनिस्सारण वाहिनी वृध्दीकरण कामाकरिता रककम 85 करोड 80 लाख इतका खर्च अपेक्षित असणे, यासंदर्भात महापालिकेने म्हाडा यांच्याकडे केलेला पत्रव्यवहार, परंतु म्हाडाकडून अदयाप 50 टक्के रक्कम अदा न होणे, परिणामी मलनिस्सारण काम ठप्प् होणे, याबाबत शासनाने लक्ष घालून तात्काळ 50 टक्के रक्कम अदा करण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | १३४१ | १० | स्थानिक लोकप्रतिनिधींच्या विक्रोळी मतदार संघातील कन्नमवार नगर व टागोरनगर मध्ये म्हाडा वसाहती असून या वसाहतीमधील जलवाहिन्या जुन्या व जीर्ण झालेल्या असणे, मलनिससारण वाहिन्यांना गळती लागणे, तसेच या भागात मोठया प्रमाणात पुनर्विकासाचे काम सुरु असल्याने लोकसंख्येदेखील वाढ होत असणे, सदर वसाहतीमधील जलवाहिन्याचे उन्नतीकरण होणे गरजेचे असणे, याकरिता महानगरपालिकेने 43 कोटी रुपये खर्च अपेक्षत असल्याचे म्हाडा विभागाला पत्राद्वारे कळविणे, म्हाडाकडून अदयाप कोणतीच कार्यवाही न होणे, याबाबत शासनाने लक्ष घालून तात्काळ म्हाडाने 43 कोटीपैकी 20 कोटी रुपये रक्कम महापालिकेकडे वर्ग करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (९) | १३४२ | १० | स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मतदार संघातील कन्नमवार नगर - 2 येथील गाळेधारक हे गेल्या 50 ते 60 वर्षापासून व्यवसाय करीत आहेत या सर्व गाळेधारकांना निवासी दराने गाळे मिळण्यासाठी वर्षानुवर्षे सातत्याने गृहनिर्माण विभागाकडे पाठपुरावा करणे, यासंदर्भात दिनांक 3 मार्च, 2025 व 13 जुन, 2025 रोजी दोनदा बैठका झाल्या या बैठकांमध्ये प्राधिकरण ठराव क्रमांक 7092 दि. 29/02/2024 नुसार निवासी दराप्रमाणे गाळेधारकांना गाळे विक्री किंमत आकारणी करुन गाळे देण्यात ठरणे, गृहनिर्माण विभागाकडून गाळेधारकांना वाणिज्य दर रु. 19000/- प्रति चौरस फुट प्रमाणे गाळे देणार असल्याचे समजत असणे, सदरहू गाळेधारकांचे उत्पन्न अत्यंत अल्प असल्याने त्यांना वाणिज्य दराप्रमाणे परवडणारे नसणे, त्याकरिता या गाळेधारकांना निवासी दराप्रमाणे गाळे देण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (१०) | १२८२ | १० | मालाड (पश्चिम) येथील मालवणी परिसरात लोकसंख्येचा प्रचंड विहंगम विस्तार झाला असून, येथील बहुतांश नागरिक अत्यंत अपुऱ्या नागरी सुविधांखाली दाटीवाटीच्या वस्त्यांमध्ये राहत असणे, या भागात सांडपाण्याची विल्हेवाट, अरुंद रस्ते, स्वच्छतेचा अभाव आणि पिण्याच्या पाण्याचे गंभीर प्रश्न निर्माण झाले असणे, नियोजित आराखडा नसल्यामुळे येथे आरोग्य आणि सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असणे, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या तरतुदींनुसार, मालवणी क्षेत्राला अधिकृतरीत्या 'झोपडपट्टी क्षेत्र' घोषित करणे आवश्यक असणे, यामुळे पात्र झोपडपट्टीधारकांना हक्काची पक्की घरे मिळतील आणि अनधिकृत बांधकामांना आळा बसेल, शासनाने या भागाचे तात्काळ सर्वेक्षण करून, सक्षम प्राधिकरणाद्वारे या क्षेत्राला झोपडपट्टी घोषित करावे आणि SRA अंतर्गत पुनर्विकास प्रक्रिया जलदगतीने सुरू करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (११) | १२८३ | १० | मुंबईतील वरळी येथील जिजामाता गृहनिर्माण संस्था, श्री विवेकानंद नगा सहकारी गृहनिर्माण संस्था, वीर जीजामाता नगर सहकारी गृहनिर्माण संस्था आणि माता रमाबाई नगर सहकार गृहनिर्माण संस्था येथील झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन करण्यासाठी येथील महापालिकेच्या जमिनीवर विकासक वरळी अर्बन डेव्हलमेंट प्रोजेक्ट एलएलपी यांनी पुनर्विकास प्रकल्प हाती घेतला असणे येथे विकासकाने पालिकेच्या आक्षेपांना न जुलामना एसआरएने ११ एप्रिल, २०२५ रोजी येथे सात संक्रमण इमारतींना मंजूरी देणे, मार्च २०२५ मध्ये विकासकला काम थांबविण्याच्या सुचना दिल्यानंतरही ही मंजूर देण्यात येणे, हे करताना पालिकेच्या दाव्यांबद्दल काही |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | स्पष्ट उल्लेख केलेला नसणे, हा सर्व प्रकार शासाच्या डोळयात धुळफेक करणारा असणे, यांसदर्भात पालिकेच्या तक्रारी असल्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१२) | १२८५ | १० | सरदार वल्लभभाई पटेल नगर, अंधेरी (पश्चिम) मुंबई येथील वर्सोवा-अंधेरी आशिर्वाद सहकारी गृहनिर्माण संस्था लि. व वर्सोवा-अंधेरी शिवदर्शन सहकारी गृहनिर्माण संस्था लि.या म्हाडाच्या गृहनिर्माण सस्था असून सदरच्या संस्था अतिशय मोडकळीस आल्या असणे, पावसाळयात पाणी झीरपत असणे, स्थानिक रहिवाशी आपला जीव मुठीत घेऊन रहात असणे, चाळ कोसळून एका माणसाचा मृत्यू झाला असणे, चाळी अतिशय जीर्ण झाल्या असणे, त्यामुळे तिन्ही संस्थांनी एकत्रित पुनर्विकास करण्यात यावा, अशी मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा, मा. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री, अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे दिनांक ९ डिसेंबर, २०२५ व १२ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास मागणी केली असणे, मात्र शासनाने अद्याप पुनर्विकास प्रस्तावास मान्यता दिली नसणे, एकत्रित पुनर्विचार प्रस्तावास तातडीने मान्यता देण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१३) | १३२२ | १० | मुंबई उपनगरातील मालाड (प.) मालवणी येथील दादासाहेब गायकवाड नगर येथे म्हाडाचे २५०० बैठे निवासी गाळे असून शासनाने दि. १८/५/१९८७ रोजीच्या शासन निर्णयान्वये बैठे निवासी गाळे विक्री योजना लागू केली व त्यानुसार सन १९९३ मध्ये गाळेधारकांच्या संमती पत्रकानुार परवानगी देण्यात येणे, परंतु सदर योजनेस अत्यल्प प्रतिसाद मिळणे, २५०० बैठे निवासी गाळेधारकांपैकी १४२९ निवासी गाळयांना या विक्री योजनेंतर्गत सहभागी करण्यात येणे, उर्वरित १०७१ बैठे निवासी गाळेधारक अपरिहार्य कारणामुळे या योजनेंत सहभागी होऊ शकले नसणे, बैठे निवासी गाळेधारक अत्यल्प उत्पन्नधारक असणे, त्यामुळे ते या विक्री योजनेत सहभागी न होणे, याकडे शासनाने १०७१ या बैठे निवासी गाळेधारकांसाठी नवीन विक्री योजना लागू करुन निवासी गाळे हस्तांतरीत करणे गरजेचे असणे, यासंदर्भात दि. ४/१२/२०२५ रोजी मा.उपाध्यक्ष म्हाडा यांच्या दालनात बैठक आयोजित करण्यात येणे, या बैठकीचे इतिवृत्त मिळावे, अशी येथील रहिवाशांची मागणी असणे, पाणी शुल्क, भाडेवाढ मागे घ्यावी, १९९९ मध्ये पैसे भरलेल्या रहिवाशांना ओनरशिप लेटर मिळावे, याबाबत वारंवार मागणी करुनही त्यावरील कारवाईस |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | शासन करीत असलेले दुर्लक्ष, परिणामी येथे व्यक्त होणारा असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: क्यू-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण**<br>**रूपये:- ५,००,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (१४) | १२८६ | १० | आशा महिला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था मर्यादित वरळी, मुंबई व विजयश्री बेरोजगार सेवा संस्था,वरळी मुंबई या संस्था रजिस्टर असून मागील १५ वर्षापासून अंगणवाडी चालविणे, निराधार महिलांना शासनातर्फे अनुदान मिळून देणे, मुलामुलींना प्रशिक्षण व्यक्तीमत्व विकास, सामाजिक कार्य आदी समाजोपयोगी कार्य करीत आहे. या संस्थेचा वाढता कारभार विचारात घेऊन संस्था अधिक गतिमान होण्यासाठी व जागेची अडचणी असल्याने सोसाव्या लागणाऱ्या अनेक गंभीर समस्यांमुळे संस्थेने बी.डी.डी. चाळ क्र.४६ मधील खोली क्र. ३ व ५ सामाजिक कार्यासाठी मिळाव्यात म्हणून मागणी केली आहे, संस्थेच्या वाढत्या कामांमुळे अपु-या जागेअभावी निर्माण झालेल्या गंभीर समस्या, सबब सदरहू संस्थांना विनाविलंब मागणीप्रमाणे कक्ष मिळण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १२ मार्च, २०२६**

**डॉ. विलास आठवले,**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) गृहनिर्माण विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई